महाराष्ट्र शासन

# शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव

पत्ता : प्लॉट क्र.एच.०८/०९/०५, एम.आय.डी.सी.परिसर, जळगाव - ४२५ ००३ ई-मेल : gdchjalgaon@gmail.com
दुरध्वनी क्र.०२५७-२२२००२५

जा.क्र.शादंमरुज/आस्था-राजप/अध्यापक/पदभरती/ 813 /२५ दिनांक : 17/10/2025

## जाहिरात

( जाहिरात क्र.०१/२०२५ )

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव या संस्थेतील खालील नमुद विविध विषयातील सहाय्यक प्राध्यापक पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करार पद्धतीने ( pure contractual basis ) ३६४ दिवसांकरिता ठोक मानधन तत्त्वावर भरण्याकरिता पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून दि.१८.१०.२०२५ ते ३०.१०.२०२५ ( सायं.०५:०० वाजेपर्यंत ) अर्ज मागविण्यात येत आहेत.

**तात्पुरत्या स्वरुपात भरावयाच्या रिक्त पदांचा तपशिल**

| अ.क्र. | पदनाम व विषयाचे नाव | भरावयाची पदे |
|---|---|---|
| १ | सहाय्यक प्राध्यापक, दंतविकृती व अणुजीवशास्त्र | ०२ |
| २ | सहाय्यक प्राध्यापक, मुखशल्यचिकित्साशास्त्र | ०१ |
| ३ | सहाय्यक प्राध्यापक, मुखरोगनिदान व क्ष-किरणशास्त्र | ०१ |
| ४ | सहाय्यक प्राध्यापक, कृत्रिमदंतशास्त्र | ०१ |
| ५ | सहाय्यक प्राध्यापक, दंतशल्यशास्त्र | ०२ |
| ६ | सहाय्यक प्राध्यापक, दंतपरिवेष्टनशास्त्र | ०१ |
| ७ | सहाय्यक प्राध्यापक, बालदंतशास्त्र | ०१ |
| ८ | सहाय्यक प्राध्यापक, सामाजिकदंतशास्त्र | ०१ |
| ९ | सहाय्यक प्राध्यापक, दंतव्यंगोपचारशास्त्र | ०१ |

❖ अर्ज सादर करण्याची पद्धत व वेळापत्रक :

| | |
|---|---|
| अर्ज मिळण्याचे ठिकाण | राजपत्रित आस्थापना विभाग, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव, एम.आय.डी.सी. परिसर, जळगाव - ४२५००३ |
| अर्ज जमा करण्याचे ठिकाण | आवक-जावक विभाग, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव |
| अर्ज मिळण्याचा व जमा करण्याचा कालावधी | दि. १८/१०/२०२५ ते दि. ३०/१०/२०२५ रोजी सायं. ०५ : ०० वाजेपर्यंत ( सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून ) |
| अर्ज जमा करण्याची अंतिम तारीख | दि.३०/१०/२०२५ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत |
| पात्र उमेदवारांच्या मुलाखतीसाठी यादी प्रसिद्ध करण्याची तारीख व ठिकाण | दि.३१/१०/ २०२५ रोजी दुपारी ०३:०० वा. सूचनाफलक, शा.दं.म.व रु. जळगाव |
| मुलाखतीची तारीख, वेळ व ठिकाण | दि.०३/११/२०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता बैठक कक्ष, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव |

१. परिपुर्ण भरलेले अर्ज ऑफलाईन पद्धतीने आवश्यक कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रतींसह विहित कालावधीत सादर करावेत, टपालाने सादर केलेले अर्ज स्विकृत केले जाणार नाहीत.

२. जाहिरातीस अनुसरुन विहित निकष / पात्रता तसेच अर्जामधील दाव्यांच्या अनुषंगाने आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती अर्जासोबत जोडाव्यात.

❖ **मुलाखतीसंदर्भात सर्वसाधारण सूचना :**

१. मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी सूचनाफलकावरील यादीचे अवलोकन करुन उपस्थित रहावे.

२. मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनी मुलाखतीच्या वेळी सर्व मुळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहिल.

३. मुलाखतीसाठी उमेदवारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल त्याकरिता कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.

❖ **सहाय्यक प्राध्यापक या पदाकरिता सर्वसाधारण पात्रता :**

उमेदवार हा भारताचा नागरिक असावा.

❖ **वयोमर्यादा :**

सहाय्यक प्राध्यापक पदाकरिता उमेदवाराचे वय अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास / walk in interview पर्यंत ४० वर्षांपेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांकरिता उच्च वयोमर्यादा पाच वर्ष शिथिलक्षम राहील.

❖ **सहाय्यक प्राध्यापक पदाकरिता शैक्षणिक पात्रता**

१. उमेदवाराने संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी ( एम.डी.एस./एम.डी./एम.एस.) अर्हता किंवा त्यास समकक्ष अर्हता मान्यताप्राप्त विद्यापीठातून धारण केलेली असावी. तसेच भारतीय दंत परिषद, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य दंत परिषद, मुंबई यांच्या मानंकानुसार अर्हता धारण केलेली असावी.

२. उमेदवार डेन्टिस्ट ॲक्ट -१९४८ नुसार नोंदणीकृत असावा. तसेच महाराष्ट्र राज्य दंत परिषद, मुंबई यांच्याकडील वैधताप्राप्त नोंदणीकृत असावा.

❖ **निवडीची कार्यपद्धती :**

सहाय्यक प्राध्यापक पदासाठी भारतीय दंत परिषद व राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानंकानुसार अर्हता धारण केलेल्या बंधपत्रित उमेदवारांची गुणानुक्रमानुसार निवड करण्यात येईल व नंतर इतर उमेदवारांची गुणानुक्रमानुसार रिक्त पदावर निवड करण्यात येईल. उमेदवारांची निवड गुणानुक्रमे व एम.डी.एस.उत्तीर्ण होण्यासाठीचे प्रयत्न ( NO. OF ATTEMPTS ) विचारात घेऊन करण्यात येईल.

❖ **मानधन :**

सहाय्यक प्राध्यापक पदाकरिता निवड झालेल्या उमेदवारांना दरमहा रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख फक्त ) इतके ठोक मानधन अनुज्ञेय असेल. सदर मानधनाव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते वा आर्थिक लाभ अनुज्ञेय असणार नाही.

❖ **अटी व शर्ती :**

१. करार पद्धतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे आगोदर घडेल इतका राहील. या कालावधीमध्ये / महाराष्ट्र लोकसेवा आयोग / निवड मंडळ पुरस्कृत नामनिर्देशनाने / बंधपत्रित उमेदवार / बदलीने / नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यास तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती तात्काळ संपुष्टात येईल.

२. उमेदवार संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिकदृष्टया सक्षम असावा. निवडीनंतर वैद्यकीय मंडळाचे वैद्यकीय प्रमाणपत्र व सक्षम प्राधिकाऱ्याचे चारित्र्य प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.

३. उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गातील असल्यास जातीच्या दाखल्याची पडताळणी करणे बंधनकारक असेल.

४. उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पुर्वसूचनेशिवाय संपुष्टात येईल.

५. करार पद्धतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकांनुसार अध्यापक, रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.

६. करार पद्धतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राह्य धरला जाणार नाही. सदरील नियुक्ती ही अत्यंत तात्पुरत्या स्वरुपाची आहे.

७. करार पद्धतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमितिक रजा अनुज्ञेय असतील.

८. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

९. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.

१०. उमेदवाराच्या कामकाजाचे मुल्यांकन होणे आवश्यक आहे. यासाठी संबंधित विभाग प्रमुखांनी दर तीन महिन्यांनी उमेदवाराच्या कामकाजाचा तपशीलवार आढावा स्वत:च्या अभिप्रायासह अधिष्ठाता यांना सादर करावा. उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास तात्काळ प्रभावाने नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल.

११. सदरील जाहिरातीत अंशत: अथवा पुर्णत: बदल करण्याचे अथवा जाहिरात रद्द करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरितांनी राखून ठेवेलेले आहेत.

१२. अर्जदाराने निवडप्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवडप्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१३. सदरील जाहिरातीमधील रिक्त पदे, शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा, मानधन, निवडीची कार्यपद्धती, अटी व शर्ती व अन्य बाबी ह्या शासनाच्या प्रचलित नियमानुसार लागु राहतील.

( डॉ.जगदीशचंद्र वठार )
अधिष्ठाता,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,
जळगाव

प्रति :
सूचनाफलक,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव

प्रत : १.मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा.अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर / मुंबई / नागपुर यांना विनंती करण्यात येते की, सदरील जाहिरात आपल्या संस्थेच्या सूचनाफलकावर प्रसिद्ध करण्यात यावी.

३. मा.आयुक्त कार्यालयाचे संकेतस्थळ ( www.med-edu.in)

**GOVERNMENT DENTAL COLLEGE & HOSPITAL, JALGAON (M.S.)**
**APPLICATION FORM**

TO,
THE DEAN,
GOVERNMENT DENTAL COLLEGE & HOSPITAL,
JALGAON ( MAHARASHTRA )

| Date : | / / |
|---|---|

Candidate's Colour Passport type Photograph

1.Post Applied For

( Assistant. Professor/Associate Professor/Professor) :

2. Subject in which applied :

3.Name in Capital Letters :

4. Gender ( Male / Female / Others ) :

5. Date of Birth :

6. Age as on Date of Interview :

7. Category of the Candidate (OPEN/EWS/OBC/SC/ST/SEBC/VJNT) :

8. Caste :

9. Qualifications ( BDS/MDS/MBBS/MD/MS/DNB/PG Diploma etc. with Certificates ) :

| Sr. No. | Qualifications | College | Board/ University | Year of Passing | Marks Obtained | Total Marks | Marks in % | Attempts |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | | | | | | |

10. Experience

| Sr. No. | Position held | Institution | From | To | Total | Teaching / Non-Teaching | Nature (Regular/ Contract) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | |
| 2 | | | | | | | |
| 3 | | | | | | | |
| 4 | | | | | | | |

11. List of Publications ( Only DCI/NMC approved )

| SR. No. | Title ( Vancouver Style ) | Author Position | Name of Journal | Name of Indexing Body |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |
| 5 | | | | |
| 6 | | | | |

12. DCI/MSDC/NMC/MMC/OTHER STATE DENTAL COUNCIL ( Tick √ )
( I ) Registration No. :

( II ) Date of Registration :

( III ) Name of Issuing Authority :

( IV ) Validity of Registration :

13. Contact Number :

14. E-mail ( in CAPITAL letters ) :

15. Postal Address :

16. Martial Status :

17. Number of Children :

18. Nationality :

19. Mother Tongue :

20. Details of Identity Certificate
( i ) Aadhar Number :

( ii ) PAN Number :

21. Identification Mark :

**DECLARATION**

I Undertake that all the above information given above me is correct to the best of my knowledge and I solemnly affirm that if any information given by me, if found wrong at any stage, my candidature for the post will automatically stand cancelled.

Date :

Name & Signature of Candidate

**Important** ( Read before filling forms ) :

- Incomplete application is liable to be rejected.
- Form should be filled by candidate in person with clear and CAPITAL letters.
- Photograph should be with clearly visible face & both ears.

## CHECKLIST

List of documents which are to be submitted with application form

| Sr. No. | Name of Documents | Submitted : Yes / No, if No, Reason ? |
|---|---|---|
| 1 | S.S.C. Certificate for Date of Birth | |
| 2 | All Mark Sheets of BDS / MBBS | |
| 3 | Attempt Certificate of BDS / MBBS | |
| 4 | Degree Certificate of BDS / MBBS | |
| 5 | Mark Sheets of MDS / MD / MS / DNB | |
| 6 | Attempt Certificate of MDS / MD /MS / DNB | |
| 7 | Degree Certificate of MDS / MD / MS / DNB | |
| 8 | EWS/ OBC / SC / ST / VJNT Certificate when applicable | |
| 9 | Caste Validity Certificate, if applicable | |
| 10 | Non Creamy-Layer Certificate, if applicable | |
| 11 | DCI/MSDC/NMC/MCI/MMC Registration Certificate (Updated ) | |
| 12 | Aadhar Card | |
| 13 | Proof of Publication | |
| 14 | NOC from Current Employer, if applicable | |
| 15 | Relieving Certificate from previous employer, if applicable | |
| 16 | Experience Certificate, if applicable | |
| 17 | Any Other | |

Date :

Signature of Candidate :

Name of Candidate :